# पाऊले चालती वनहक्काची वाट



वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी
‘इकोनेट’च्या प्रयत्नांचा प्रवास









2023/09/26 15:11




पेसा नियम २०१४ मधील महत्त्वाच्या तरतुदी




आपल्या गावातील कारभारासाठी
गावाच्या सर्वांगीण विकासासाठी
निर्णय घेणारे ठिकाण म्हणजे
आपली ग्रामसभा.
आपण आपल्या गावातील सुजाण
ग्रामस्थ आपल्या गावातील एका
आर्थिक वर्षात होणाऱ्या मुख्य
चार आणि दोन विशेष ग्रामसभांमध्ये
आपल्या हक्कांसाठी, कर्तव्यांसाठी,
आपले प्रश्न मांडण्यासाठी,
व त्या मागण्या पूर्ण करण्यासाठी
आणि आपल्या गावाच्या सर्वांगीण
विकासासाठी आपल्या घरातील
महिला, पुरुष, पारलिंगी, जेष्ठ

# पाऊले चालती वनहक्काची वाट

वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी
'इकोनेट'च्या प्रयत्नांचा प्रवास

**इकोनेट**
फ्लॅट नं. २, गुलमोहर ओरीयन, एस.आर.पी.एफ. गेट नं १ जवळ,
सर्व्हे नं. ११०/अ/९, रामटेकडी रोड, हडपसर,
पुणे : ४११ ०१३, महाराष्ट्र.
फोन : (+९१) ७४२००२७७५५
इमेल : econet.pune@gmail.com वेबसाईट : www.econetindia.org

# पाऊले चालती वनहक्काची वाट

| | |
|---|---|
| **प्रक्रिया नोंद पुस्तिका** | पाऊले चालती वनहक्काची वाट |
| **संकल्पना** | गौरी भोपटकर |
| **लेखन** | अमृता वाळिंबे |
| **मार्गदर्शन** | जितेंद्र कठाळे |
| **छायाचित्र आणि मुखपृष्ठ** | राहुल साळवी |
| **विशेष आभार** | अमित कुलकर्णी<br>काळू निरगुडे<br>भाऊ गडगे<br>बन्सी परते<br>काशिनाथ सलाम |

# ऋणनिर्देश

पाऊले चालती वनहक्काची वाट हे वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करत असताना इकोनेट संस्थेने केलेले प्रयत्न, पद्धती आणि रणनीती या सर्व प्रक्रियेविषयीची माहिती सांगण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली प्रक्रिया माहिती पुस्तिका आहे. ही पुस्तिका तयार करताना अनेक व्यक्तींचा सहभाग मिळाला आहे. आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. या प्रक्रिया पुस्तिकेमधील माहितीचा उपयोग वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया व कायदा समजून घेण्यासाठी आणि परिस्थितीनुसार वेगवेगळ्या रणनीती तयार करण्यासाठी होऊ शकेल. या प्रक्रियेमध्ये समाविष्ट झालेली सर्व गाव / पाडे / तांडे, ग्रामपंचायत सदस्य यांचेही आभार. तसेच गावात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, स्थानिक समुदाय याचेही मनापासून आभार. माहितीसंकलन व लिखाणाचे मोलाचे काम करणाऱ्या अमृता वाळिंबे यांचेही मनापासून आभार. कार्यक्षेत्रातील सर्व कार्यरत सहभागी व्यक्ती, समन्वयक व संस्था तसेच इकोनेट टीम या सर्वांचेही आभार. या सर्वांनी या कामासाठी दिलेले योगदान व समर्पण हे खूप मोलाचे आहे.

**इकोनेट,**
पुणे.

# प्रस्तावना

वनहक्क कायदा २००६ कायद्याची अंमलबजावणी करताना इकोनेट संस्थेने एक ध्येय समोर ठेवले आहे की, या कायद्यातील तरतुदींची आदिवासी समुदायाला अधिकाधिक माहिती देऊन, कायद्याने मान्य केलेले वन हक्क आदिवासी समुदाय व कुटुंबाना मिळाले पाहिजेत. हे करत असताना २००६ च्या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी असणाऱ्या प्रशासकीय विभागांची वन हक्क कायदा २००६ तसेच आदिवासींचे संविधानिक अधिकार याविषयीची समज, माहिती व संवेदनशीलता वाढवण्याचे काम इकोनेट संस्था करते. आदिवासी समुदायाला त्याचे हक्क व अधिकार मिळाले पाहिजेत, सन्मानपूर्वक जीवन जगता आले पाहिजे, या उद्देशाने प्रेरित होऊन संस्था मागील ३० वर्षापासून महाराष्ट्र राज्यामध्ये १० जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे. वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करताना संस्था कायद्याविषयी जाणीवजागृती करणे, स्थानिक पातळीवर मिटींग घेणे, प्रशिक्षण घेणे, माहिती पुस्तके पुरविणे, वन हक्क प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेत मदत व मार्गदर्शन करणे, वन हक्क दाव्यांचे फॉर्म भरण्यास व पुरावे मिळण्यासाठी मदत करणे, शासकीय कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेणे, दाखल केलेल्या दाव्यांमध्ये पाठपुरावा करणे अशा वेगवेगळ्या पातळीवर काम करत आहे. वनहक्क कायद्यासंदर्भात आदिवासी समुदायांची, स्थानिक कार्यकर्ते व ग्राम सभा सदस्यांची क्षमता बांधणी/वृद्धीकरण याला संस्थेने प्राधान्य दिले. त्याचप्रमाणे कायद्यातील तरतुदीनुसार स्थानिक ठिकाणी समित्या गठित करण्यासाठी मार्गदर्शन

करणे, गठित समित्यांना प्रशिक्षण देणे, ग्रामसभेचे हक्क व अधिकार याची माहिती देणे तसेच ज्या वनक्षेत्रामध्ये सामूहिक अधिकार मिळाला आहे त्या वनक्षेत्राचा स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने वन व्यवस्थापन आराखडा तयार करण्यास मदत करणे, गाव पातळीवर फलकाच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करणे व गावाची स्वतंत्र ओळख निर्माण करणे या प्रकारची कामे संस्था ७ विभागीय क्षेत्रात करीत आहे. हे करत असताना संस्थेने स्थानिक नेतृत्व बांधणी केली आहे. त्यामध्ये स्थानिक पंचायत सदस्य, गावातील होतकरू युवक व युवती, स्थानिक संस्था/संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश होतो. आदिवासींच्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी हे स्थानिक नेतृत्व घडविण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला. त्यामुळेच त्या त्या कार्यक्षेत्रांत वन हक्क कायदा २००६ बाबत आदिवासी समुदायांत दिसणारी जागरूकता व कायद्याच्या अंमलबजावणीचे काम आजही निरंतर चालू आहे. वनहक्क कायदा २००६ हा सामूहिक व वैयक्तिक असे दोन प्रकारचे वन हक्क मान्य करतो. हा कायदा येण्याअगोदर वनक्षेत्रात आदिवासींचे वास्तव्य व ते करत असलेली वनजमिनीवरील शेती हे अतिक्रमण ठरवले जायचे. वन क्षेत्रात वनखात्याच्या अधिकृत परवानगीशिवाय प्रवेश करणे हादेखील गुन्हा समजला जायचा. परंतु, आदिवासींचे जंगलासोबतचे पारंपरिक नाते मान्य करून २००६च्या कायद्याने आदिवासींचे वनक्षेत्रातील वास्तव्य व उपजीविकेसाठी केलेला वापर/संचार याला मान्यता दिली. कायद्याने सामूहिक व वैयक्तिक हक्कांना मान्यता देण्यासाठी एक सविस्तर प्रक्रिया निश्चित केली. त्यानुसार ज्या आदिवासी समुदायांना किंवा कुटुंबाना त्यांचे हक्क निश्चित करून हवे आहेत त्यांनी दावे दाखल करून, त्यासाठीचे पुरावे, नोंदी इत्यादी सादर करणे अपेक्षित आहे. आदिवासी

समुदाय हा बहुतांशी शिक्षित नसल्यामुळे वनहक्क कायदा २००६ च्या कायद्याला अपेक्षित प्रक्रिया करण्यास समुदायाचे प्रतिनिधी व कुटुंबे कमी पडतात. परिणामत: त्यांचे वन हक्क दावे नामंजूर केले जातात किंवा वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. इकोनेट संस्थेने किनवट, इगतपुरी, धारणी व जव्हार या कार्यक्षेत्रामध्ये वनहक्क कायद्याची अंमलबजावणी तसेच दावे मंजूर करण्यासाठी विशिष्ट रणनीती अंमलात आणली. या पुस्तकाच्या माध्यमातून इकोनेट संस्थेने आदिवासी समुदाय, स्थानिक संस्था व यंत्रणा तसेच प्रशासनासोबत वनहक्काच्या कोणकोणत्या प्रक्रिया कशा पद्धतीने केल्या याची प्रक्रिया नोंद सखोल व सविस्तर स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरून वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करताना व्यक्ती, संस्था व आदिवासी समुदायांच्या प्रतिनिधींना वन हक्क मान्यतेची प्रक्रिया समजून येण्यास सोपे जाईल. या पुस्तिकेचा उपयोग वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होईल व त्यामुळे जास्तीत जास्त आदिवासी समुदायांना त्यांचे वन हक्क प्रस्थापित करण्यासाठी मदत होईल अशी अपेक्षा.

संस्थेचा पत्ताः–

**इकोनेट संस्था पुणे**

गुलमोहर ओरीअन, सर्वेन ११०/अ/९, एस.आर.पी.एफ. गेट नं. १ जवळ.

रामटेकडी, पुणे : ४११ ०१३. फोन :– ७४२००२७७५५.

# पाऊले चालती वनहक्काची वाट

वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी
'इकोनेट'च्या प्रयत्नांचा प्रवास

*''योजना होत्या की आमच्यासाठी; नाही असं नाही. पण हा कायदा आला आणि खरोखरंच कुठल्यातरी गुलामीतून सुटका झाल्यासारखं वाटू लागलं.''*

*''जंगलात आम्हाला लपून लपून जायला लागायचं. पकडलं गेलं तर दंड व्हायचा. केसेस व्हायच्या. आम्ही कसंबसं सांभाळलं सगळं. पण आमच्या पुढच्या पिढ्या काय करतील, पोराबाळांचं कसं होईल असं वाटत होतं. आता जंगलाचा, जमिनीचा अधिकार मिळाला. ही खूप मोठी गोष्ट झाली आमच्यासाठी!''*

*''जंगलातून मोळ्या आणू नका, शेती करू नका असलं अधिकारीलोक सांगायचे. कोंबडी द्या, तांदूळ द्या असं काय काय मागायचे. कुणाला किती दंड करायचा, किती आणि कशी वसुली करायची ते सर्व ठरवायचे. त्यामुळे साधेसुधे लोक घाबरून असायचे. आता मात्र कायदा पाठीशी आहे हे लक्षात आल्यापासून जंगलात जायला घाबरत नाहीत.''*

*''आधी सरकारी ऑफिसात अपमानास्पद वागणूक मिळायची आम्हाला. वाट्टेल तसं बोलायचे. आता गोष्ट बदललीय. आम्हाला ऑफिसात घेतात, आमच्याशी बोलतात, आमचं ऐकून घेतात. आमचे अनुभव सांगायला आणि प्रशिक्षणं घ्यायलाही आम्हाला बोलावतात.''*

*''सार्वजनिक कामात जाणं किंवा ग्रामसभेला जाणं तरुण टाळतात असं साधारणपणे दिसतं. पण गावाच्या भविष्याच्या दृष्टीने काही बदल व्हायला हवा असेल तर तरुणांनी पुढे यायला हवं. आता पाड्यापाड्यावर प्रशिक्षणं झाल्यावर तरुण पुढे येऊ लागले आहेत. आपापल्या गावात पेसा गट, वन हक्क गट स्थापन करु लागले आहेत. प्रशिक्षणातून नवं नेतृत्व घडत आहे.''*

हे शब्द, या भावना, हे अनुभव कुणा एकाचे नाहीतः यात कुणी कोरकू आहेत, कुणी महादेव कोळी, गोंड, तर कुणी कोकणा, महादेव ठाकूर, कोलाम किंवा वारली! वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जीवतोड प्रयत्न करणाऱ्यांचे, कायद्याचं पाठबळ मिळाल्यावर घडणारा बदल पाहणाऱ्यांचे जितेजागते अनुभव आहेत हे. यांची नावं, समूह, रीतिरिवाज, भाषा, पाडे, तांडे नि गावं निरनिराळी ; पण हे सर्व आदिवासी.

हे सारे खरंतर कधीकाळचे जंगलाचे राजे ; पण गेल्या शंभर–सव्वाशे वर्षात विविध कायद्यांच्या चौकटीत बसवून 'गुन्हेगार' ठरवले गेलेले. आपल्याच परंपरागत जल, जंगल, जमिनीला पारखे झालेले. दारिद्र्य, शोषण आणि 'ऐतिहासिक' अन्यायाच्या गर्तेत सापडलेले!

'वन हक्क कायदा, २००६' हा म्हणूनच यांच्यासाठी परिवर्तनाची वाट दाखवणारा ठरला.

अर्थात नुसता एक सुधारणावादी कायदा होऊन भागणार नव्हतं. वन हक्क कायद्याचं बोट धरून आदिवासी समूहांनी परिवर्तनाच्या वाटेवर चालावं म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जाणं आवश्यक ठरलं.

ही आवश्यकता केंद्रीभूत मानून जनजागृती, मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जाणं महत्त्वाचं ठरलं. या पार्श्वभूमीवर, रचनात्मक व संघर्षात्मक कामासाठीच्या मार्गदर्शनाची, प्रशिक्षणाची व पाठबळाची अनुभवी पोतडी सोबत घेऊन यांच्या साथीला उभी राहिली – इकोनेट!

साल होतं २००७–०८.

लोकहितासाठी हक्काधारित विचाराने कार्यरत असलेल्या 'इकोनेट' संस्थेचं काम महाराष्ट्रातल्या वंचित; विशेषत: भटके–विमुक्त व आदिवासींच्या प्रश्नांना हात घालत पुढे चाललं होतं. हक्काची लढाई लढत आलेल्या लोकचळवळी, संस्था, संघटना यांच्या दीर्घकालीन रेट्यातून साकारलेला वन हक्क कायदा २००६ नुकताच लागू झाला होता.

'इकोनेट' संस्थेने त्या पार्श्वभूमीवर एक महत्वपूर्ण पाऊल टाकलं. महाराष्ट्रातल्या नऊ संस्थांच्या माध्यमातून चौदा जिल्ह्यातली गौण वनोपजविषयक सद्यस्थिती विस्तृत व सखोलपणे समजून घ्यायचा प्रयत्न केला. 'गौण वनोपज महाराष्ट्र मंच' या व्यासपीठाद्वारे सामूहिक प्रयत्नातून सर्वेक्षण करण्यात आलं. गौण वनोपज, आदिवासी समाज व जंगलं यांच्यातलं नातं या विषयीचा हा अभ्यास 'इकोनेट'च्या पुढाकारातून केला गेला.

तो अभ्यास, त्यावेळी जोडली गेलेली गावं / पाडे / तांडे आणि स्थानिक सामाजिक संस्था, संघटना व कार्यकर्ते यांच्यासोबतची नाळ इकोनेटने तोडली नाही. उलट या सगळ्याचा आधार घेत घेत पुढे 'इकोनेट'ने वन हक्क

कायद्याच्या अनुषंगाने आपल्या कामाची रूपरेषा ठरवत नेली. आदिवासींवरचा 'ऐतिहासिक अन्याय' दूर करण्याची क्षमता असलेल्या वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीला रेटा देण्यासाठी मग त्यानुसार 'इकोनेट'ची पावलं पडत राहिली.

## आदिवासींचं वास्तवचित्र आणि 'इकोनेट'चं कार्यक्षेत्र

*भारतात जवळपास सातशे आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आणि त्यातील ३ आदिम जमाती आहेत. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १६.५ टक्के म्हणजे ५० हजार ७५७ चौ. किमी इतकं मोठं आदिवासी क्षेत्र आहे. राज्यातल्या १५ जिल्ह्यांमध्ये आणि ६८ तालुक्यांमध्ये आदिवासींची मोठी संख्या आहे.*

*२०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या एक कोटीहून अधिक आहे. म्हणजे राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के! देशातील एकूण आदिवासींपैकी १० टक्के आदिवासी महाराष्ट्रात राहातात. देशात आदिवासी लोकसंख्येबाबत मध्य प्रदेशाच्या खालोखाल महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. सह्याद्री, सातपुडा आणि विंध्य पर्वतांच्या प्रदेशात राज्यातला आदिवासी वास्तव्य करून आहे. याशिवाय इतरत्रही आदिवासींची तुरळक वस्ती आहे.*

*महाराष्ट्रातल्या आदिवासींची अर्थव्यवस्था, समाजसंघटन, धर्मविधी, कला व संस्कृती इत्यादी भारतातल्या आदिवासीं प्रमाणेच आहे. निसर्गावर; त्यातही जंगलांवर अवलंबून असलेली गुजराण, शेती तसंच अन्नसंकलन, मासेमारी व शिकार*

*हे महाराष्ट्रातल्या आदिवासींचे उपजीविकेचे मुख्य पर्याय आहेत. नैसर्गिक संसाधनांवर होत असलेल्या अतिक्रमणामुळे आदिवासींचे पारंपरिक व्यवसाय धोक्यात आले आहेत. परिणामी, उपजीविकेच्या शोधात अपरिहार्यतेपायी स्थलांतर करावं लागणाऱ्या आदिवासींची संख्या लक्षणीय आहे.*

*वन हक्क कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी व प्रशिक्षण उपक्रम राबवण्यासाठी 'इकोनेट'ने निवडलेल्या कार्यक्षेत्रामध्ये विविध अनुसूचित जमाती आहेत. या प्रत्येक जमातीची स्वतःची वैशिष्टयं आहेत. अमरावती जिल्ह्यातल्या धारणीच्या परिसरामध्ये कोरकू आणि गोंड, नांदेडच्या किनवटमध्ये गोंड आणि कोलाम, नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरीमध्ये महादेव कोळी आणि महादेव ठाकूर, तर पालघर जिल्ह्यातल्या जव्हारच्या परिसरामध्ये वारली आणि कोकणा जमातींची प्रमुख वस्ती आहे. या अनुसूचित जमातीपैकी गोंड हे ऐतिहासिक दृष्ट्या अधिक संघटित आहेत. तर विकासाच्या निर्देशांकात महादेव कोळी आणि महादेव ठाकूर या जमाती इतर अनुसूचित जमातींच्या तुलनेत पुढारलेल्या आहेत. किनवटच्या परिसरातील कोलाम ही आदिम जमात आहे.*

'इकोनेट'ने नांदेड जिल्ह्यात काजीपोड इथे पहिला क्षमता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवला २००७–२००८ मधे. गौण वनोपज सर्वेक्षण आणि नवी उमेद या स्थानिक सामाजिक संस्थेशी जुळलेली नाळ यातून तो कार्यक्रम प्रत्यक्षात आला. वन हक्क दाव्यांची प्रक्रिया सुरू करणं हा हेतू बाळगून काम सुरू झालं खरं; पण सुरुवातीलाच प्रयत्नांना खीळ बसली. दाव्याची प्रक्रिया सुरू

करण्यासाठी या गावातलं कुणीही पुढं आलं नाही. असा कुठला अधिकार आपल्याला मिळू शकेल यावर इथल्या आदिवासी समाजाचा विश्वासच बसला नाही. आणि याला कारण ठरले वर्षानुवर्षं यांच्या पदरी पडलेले दाहक अनुभव.

इथला कोलाम समुदाय हा नेहमीच मुख्य गावापासून दूर जंगलात राहणारा. फक्त काही कोलामांची स्वतःची जमीन आणि अर्ध्याहून अधिक कोलाम लोकांचे पट्टे वनजमिनीत अशी वस्तुस्थिती. इथल्या आदिवासींची उपजीविका मुख्यतः जंगल आणि विशेषत: मोह, बांबू, मध, चारोळी, डिंक अशा वनोपजांवर अवलंबून. पण हे मिळवायचं तर मोठी कसरत करावी लागायची. पकडलं गेलं तर दंड बसायचा. केसेस व्हायच्या. बांबू आणताना फॉरेस्टवाले कधी एकदोघांना झोडपायचे, मग सगळेच घाबरून जायचे. मोह, चारोळ्या, डिंक गोळा करायला बायका गेल्या की अधिकारी हटकायचे. तुम्ही धिंगाणा करता जंगलात, झाडं जाळता, तोडता, नासधूस करता असं म्हणायचे. शेती करायची तर चौकीदार, वनरक्षकांना पैसे द्यायला लागायचे. गुरं चारायला नेली, शेताला कुंपण करायला गेलं तर दंड बसवायचे. आधी दंड २०० रुपये होता मग साधारण ५००–१००० पर्यंत गेला. हे २०० रुपये 'फार' असायचे त्या जंगलात कामाला गेलेल्या गरीब कोलाम बाईसाठी. बहुतेक वेळा ते नाही देता यायचे तिला. मग मक्त्याने किंवा भाड्याने घेतलेले जे शेतपट्टे असायचे त्यांचे; तिथे शेतीच्या कामात या बाईला फुकट राबवून घ्यायचे पैसे वसूल होईपर्यंत. ही शिक्षा असायची पण याचं कुठे रेकॉर्ड नसायचं. दंड पावती नाही मिळायची. सतत वन खात्याच्या नाडवणुकीला तोंड द्यावं लागायचं, त्यांच्यापुढे नमावं लागायचं. म्हणजे परंपरेने जंगलात राहणाऱ्या, जगण्यासाठी जंगलावर अवलंबून असलेल्या लोकांना जंगलात जायचीच चोरी; अशी सगळी परिस्थिती. ताठ मानेने जंगलात जाण्याचा, तिथे वावरण्याचा, शेती

करण्याचा, वनोपज गोळा करण्याचा अधिकार आपल्याला मिळेल हे त्यांना माहीत नव्हतं. त्यामुळे वन अधिकार मिळवण्यासाठी दावा करता येतो, आपण तो करायला हवा हे जेव्हा 'इकोनेट'च्या कार्यक्रमातून यांच्यापर्यंत आलं, तेव्हा यांचा त्यावर विश्वास न बसणं हे साहजिकच होतं. अर्थात काजीपोडमधलं कुणीच दावा मानायला पुढे आलं नाही तरी इकोनेट मागे सरली नाही. हस्तक्षेपाच्या वेगळ्या वाटा शोधू लागली.

## 'इकोनेट'च्या नांदेड जिल्ह्यातल्या प्रकल्पक्षेत्राची वैशिष्ट्यं

*नांदेड जिल्ह्यामध्ये किनवट तालुक्यातल्या पुढील ग्रामपंचायती 'इकोनेट'ने प्रकल्पक्षेत्र म्हणून निवडल्या.*

*जवरला (गाव/पाडा/वस्ती/तांडा - काजीपोड, जवरला)*

*अंबाडीतांडा (गाव/पाडा/वस्ती/तांडा - शिवरामखेड, वरगुडा)*

*जरूर (गाव/पाडा/वस्ती/तांडा - जरूर)*

*कणकी (गाव/पाडा/वस्ती/तांडा - डोंगरगाव)*

*पाचव्या अनुसूचीमध्ये मराठवाड्यामधल्या नांदेड जिल्ह्यातल्या केवळ किनवट आणि माहूर या दोनच तालुक्यांचा आंशिक समावेश होतो. पूर्व विदर्भ आणि तेलंगण यांच्या सीमेवरच्या डोंगराळ वनाच्छादित भागात कोलाम आणि गोंड आदिवासींचं वास्तव्य आहे. नांदेड जिल्ह्यातला माहूर आणि किनवटचा आदिवासी पट्टा भौगोलिकदृष्ट्या याच भागात येतो. मराठवाड्याला भेडसावणाऱ्या दुष्काळाचे चटके किनवटमधील आदिवासी भागालाही बसतात. हा भाग पूर्वी हैदराबाद संस्थानामध्ये होता. आजही तेलंगणातील आदिलाबादशी या*

*भागाचे सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक संबंध टिकून आहेत. नांदेड हे जिल्ह्याचं ठिकाण किनवटपासून १६० किमी अंतरावर आहे. शेती इथे मुख्यतः पावसाच्या पाण्यावरच केली जाते. पावसाळा संपल्यानंतर पोटासाठी रोजंदारीच्या कामावर, आणि जंगलातून गौण वनोपज गोळा करणं, मासेमारी अशा कामांवर अवलंबून रहावं लागतं. उच्चशिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, रोजगाराच्या तसंच उपजीविकेच्या संधींची वानवा व वनखात्याशी संघर्ष या समस्या इथल्या आदिवासी समूहांना भेडसावताना दिसतात.*

या टप्प्यावर कामी आला – मोह! मोह ही या भागातली अत्यंत महत्त्वाची आणि प्रमुख वन उपज. मोहाच्या झाडाचा फार मोठा आधार कोलामांच्या दैनंदिन जगण्याला लाभलाय. हे झाड म्हणजे इथला जणू कल्पवृक्ष. फळं, फुलं, लाकूड, मुळं, फांद्या, बिया... मोहाची प्रत्येक गोष्ट इथे उपयोगाची. इथल्या प्रत्येकाशी जोडलेली. त्यामुळे कोलाम समूहाला विश्वासात घेण्यासाठी, त्यांना वनांशी जोडलेल्या एखाद्या मुद्द्यांवर एकत्र बांधण्यासाठी 'महुआ बँक' ही कल्पना पुढे आली. महुआ बँकेची स्थापना करण्यासाठी सामुदायिक नेतृत्व निर्माण होणं, ते सक्षम होणं आवश्यक होतं. त्यासाठी 'सेल्फ हेल्प ग्रुप्स'च्या कार्यचौकटीचा वापर करण्यात आला. संकलित केलेला मोह स्थानिक मोह काढणी करणाऱ्यांकडून खरेदी करून विक्री करण्याचा ठराव ग्रामसभेत घेण्यात आला. या नावीन्यपूर्ण उपक्रमातून काजीपोड गावातल्या कोलामांना चांगलं उत्पन्न मिळू लागलं. आदिवासी समूहाचा विश्वास मिळाला आणि कामाची मुळं परिसरात घट्ट रुजण्यास मदत झाली.

दुसरीकडे वन हक्काबाबत बोलणं, चर्चा घडवणं, जनजागृती करणं चालू होतंच. सामाजिक संस्थेचे लोक जे सांगतात ते खरं आहे का असं आदिवासींच्या मनात आलं आणि गावातलं कुणी फॉरेस्टवाल्यांना विचारायला गेलं की 'तुमच्यासाठी हा कायदाच नाही, तुम्ही यात बसत नाही. चंद्रपूर, गडचिरोलीसारख्या नक्षली भागात आहे हे सगळं' असं ऐकायला लागायचं! सरकारी लोकांसमोर कोण काय बोलणार?

इकोनेटने प्रशिक्षणं घेऊन हे चित्र पालटण्याचा प्रयत्न केला.

## भाषिक दुवा

*सामान्यत: असं दिसतं की महाराष्ट्रातल्या आदिवासी समूहातल्या अनेकांचा बाहेर जगाशी फार संपर्क, संबंध येत नाही. मराठी नीट समजतंय, वाचता-बोलता-लिहिता येतंय असं बहुतेकांच्या बाबतीत आढळत नाही. पिढ्यान् पिढ्या वापरल्या जात असलेल्या या प्रत्येक समूहाच्या आपल्या आपल्या परंपरागत भाषा आहेत. उदाहरणार्थ- इकोनेटच्या प्रकल्पक्षेत्रात कोलाम, कोकणा, गोंडी, कोरकू, वारली, कोळी, ठाकर असे वेगवेगळे आदिवासी समूह येतात आणि त्यांच्या वेगवेगळ्या भाषा आहेत. या समाजांमध्ये शिकल्यासवरलेल्या लोकांची संख्याही फार नाही. त्यामुळे इंग्रजी, हिंदी, मराठीच्या प्रमाण भाषेत लिहिलेला कायदा समजून घेणं आणि योग्य पद्धतीने उपयोगात आणणं हे त्यांच्यासाठी खचितच सहजसाध्य नाही. त्यामुळे वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीला रेटा देण्यासाठी इकोनेटने कंबर कसली खरी; पण सगळ्यात आधी आदिवासी लोकांना समजेल अशा भाषेत, अशा पद्धतीने कायदा समजावून सांगणं हे काम*

*प्राधान्याने करावं लागलं. त्या आधारे प्रशिक्षण साहित्याचं आणि त्या आधारे होणाऱ्या चर्चेचं स्वरूप ठरत गेलं. ज्या त्या भागातली स्थानिक पातळीवरची सवयीची भाषा आणि मराठी असं दोन्ही ज्यांना येत होतं त्या कार्यकर्त्यांनी याबाबतीत भाषिक दुवा बनत महत्त्वाची भूमिका पार पाडली.*

प्रशिक्षणाच्या माध्यमातून वन हक्क कायदा कुणासाठी आहे, तो काय सांगतो, कोणते अधिकार देतो हे इकोनेटने समजावून सांगितलं. ज्या गावात दावे मंजूर झालेत त्याचे शासकीय कागद दाखवले. पुरावे कसे मिळवले, कशी फाइल सादर केली, दावा कसा दाखल केला ते समजावून सांगितलं. समाजाला त्यांची उपजीविका आणि इतर समस्यांबाबत बोलतं केलं, एकत्र केलं. गावबैठका, ग्रामसभा यांच्या माध्यमातून पारंपरिक वन हक्क आणि वनविभागाबाबत लोकांची धारणा बदलावी, सकारात्मक व्हावी म्हणून प्रयत्न चालवला. गडचिरोली, चंद्रपूरला नेऊन अभ्यास दौरा घडवला. मेंढा (लेखा) वगैरे गावं दाखवली. तिथल्या लोकांशी बोलून कसं केलं, काय केलं, त्यातून काय मिळालं ते समजून घेतलं. मग गावात बैठका घेऊन फाइल तयार केली. मधल्या काळात इकोनेटने प्रशिक्षण दिल्यानुसार समित्या तयार केल्या आणि सर्व प्रक्रिया करून दावे दाखल केले. वैयक्तिक दावे मंजूर झाले, हक्क मिळाले की आत्मविश्वास वाढून सामुदायिक वन हक्कांचा विचार इथले आदिवासी अधिक हिरीरीने करतील, अशा विचारातून पावलं टाकली गेली. काजीपोडमधून सुरुवातीला ३० वैयक्तिक दावे दाखल केले गेले आणि सर्व मंजूर झाले. या मोठ्या यशामुळे मग सामूहिक दावाही दाखल करावा, असं ठरलं. गावाने प्रत्येक कुटुंबातल्या किमान दोन व्यक्ती (एक स्त्री आणि एक

पुरुष) घेऊन ग्रामसभा केली. वन हक्क समिती स्थापन केली. वन हक्क समिती सदस्य आणि इतर स्थानिक तरुणांनी समाजाला एकत्र करणं, सरकारी विभागाकडून कागदपत्रं गोळा करण्यासाठी सुविधा आणि समन्वयाची बांधणी करणं, ग्रामसभा आयोजित करणं, पडताळणी आणि ग्रामसभेत सामूहिक वन हक्क दाव्याला मंजुरी मिळवण्यापासून पाठपुराव्यापर्यंत सारं चिकाटीने केलं. सामूहिक वन हक्क दावा मिळवला. विशेष म्हणजे वनजमिनीवर सामूहिक हक्क मिळवणारं नांदेड जिल्ह्यातलं पहिलं गाव ठरलं– काजीपोड. ७२५ एकरवर गावाचा सामूहिक वन हक्क एव्हाना प्रस्थापित झाला आहे. आजघडीला नांदेड जिल्ह्यातल्या किनवट तालुक्यातल्या 'इकोनेट'च्या प्रकल्प क्षेत्रात ७ सामूहिक आणि २३ वैयक्तिक दावे मंजूर झाले आहेत. एकूण २९९४ हेक्टर इतकी वन जमीन आदिवासींना वन हक्काच्या स्वरूपात मिळाली आहे.

समाजाच्या मुख्य धारेपासून कोसो दूर असलेल्या लोकसमूहांना हक्काधारित विचार व उपक्रमांच्या माध्यमातून कृतिशील बनवण्याचा, त्यांच्या हक्कांसाठी त्यांनी हिमतीने उभं राहावं यासाठी प्रयत्न करण्याचा प्रवास आव्हानात्मक असतो. दारिद्र्याच्या गर्तेत अडकलेल्या आणि प्रगत ज्ञानापासून वंचित असलेल्या आदिवासी समूहांना जागृती, मार्गदर्शन व प्रशिक्षणाचं पाठबळ सतत पुरवत राहावं लागतं. त्यासाठीच महाराष्ट्रातले आदिवासी समूह केंद्रीभूत ठेवत हे काम इकोनेटने 'आपलं' मानलं.

## वन हक्क कायदा : महत्त्व आणि सद्यस्थिती

*उपजीविकेकरता शेती कसण्यासाठी वन जमीन धारण करण्याचे, त्यामध्ये राहण्याचे, गावानजीक गौण वनोत्पादन गोळा करण्याचे, त्याचा वापर करण्याचे, वनस्रोतांचं संरक्षण,*

पुनर्निर्माण, संवर्धन आणि व्यवस्थापन करण्याचे विविध वन हक्क अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ मधील तरतुदींनुसार आदिवासींना प्राप्त झाले आहेत. वन हक्क कायदा २००६, नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ मधील तरतुदींचं पालन करून वन हक्क दाव्यांची पडताळणी करण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागाच्या ११ नोव्हेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकानुसार निर्गमित करण्यात आल्या आहेत. या सूचनेत १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान तीन पिढ्यांपासून (पिढी याचा अर्थ २५ वर्षांचा कालखंड) वनात राहणारा आणि उपजीविकेसाठी वन जमिनीवर अवलंबून असलेल्या व निर्धारित पुराव्यांपैकी किमान दोन पुरावे सादर केलेल्या दावेदारांचे दावे अमान्य करू नयेत, असं नमूद करण्यात आलं आहे.

महाराष्ट्रात वन हक्क कायद्यानुसार दाखल झालेल्या ३ लाख ७४ हजार ७१६ वैयक्तिक आणि सामूहिक दाव्यांपैकी आतापर्यंत मंजूर करण्यात आलेल्या वैयक्तिक वन हक्क दाव्यांची संख्या १ लाख ९८ हजार ९९१ असून १ लाख ९८ हजार २३२ दावेधारकांना प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आलं आहे. त्यापैकी १ लाख ६७ हजार ३०१ दावेधारकांना सातबाराचं वाटप करण्यात आलं आहे. सामूहिक वन हक्क मान्य दाव्यांची संख्या ८ हजार ६२४ आणि मंजूर वनक्षेत्र १३ लाख ५७ हजार ६३ हेक्टर आहे. ही आकडेवारी दैनिक लोकसत्तामध्ये (६ फेब्रुवारी २०२४) नमूद आहे. अनेक लाभार्थींनी आम्ही २००५ पासून संबंधित जागेवर शेती करत

*असून, आमच्या वाट्याला कमी क्षेत्र आलं आहे, आम्हाला वाढीव अतिरिक्त क्षेत्र देण्यात यावं, आदी मागण्या दाव्यांद्वारे केल्या आहेत. वन हक्कांचे दावे तत्काळ निकाली काढावेत, असे आदेश निघालेले असूनही राज्यभरात हजारो दावे प्रलंबित असल्याचं सद्यस्थितीत दिसतं.*

इकोनेटने महाराष्ट्रातल्या आदिवासी समूहांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणं, त्यातून बदल घडवणं आणि या सगळ्यासाठी वन हक्क कायदा विशेषत: पेसा भागात वापरणं हा आपल्या कामाचा भाग बनवला. आदिवासी भागात जिथे जमिनीवर लोकांशी जोडून घेऊन काम करणारे कार्यकर्ते आहेत किंवा तशा संस्था कार्यरत आहेत त्यांना पाठबळ देऊन, त्यांची प्रशिक्षणं घेऊन वन हक्क कायदा सक्षमपणे आणि मोठ्या प्रमाणात प्रत्यक्षात कसा आणता येईल यासाठी इकोनेट कृतिशील राहिलं. त्यासाठी इकोनेटने विविध प्रकारचं प्रशिक्षण साहित्य तयार केलं. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या संस्थांशी जोडून घेऊन आधी त्या संस्थांच्या 'लीडर्स'ची, नंतर या संस्थांच्या कार्यकर्त्यांची प्रशिक्षणं घेतली. मग प्रत्यक्ष गाव–पाड्यांवर जाऊन प्रशिक्षणं घेतली. गाव आणि पाड्यावर आपणहून वन हक्कासाठी काम करायला तयार असलेल्या स्वयंसेवी तरुण, सरपंच, महिलांना सोबत घेऊन प्रशिक्षणाचं काम केलं. त्यांच्यातून नेतृत्व कसं उभं राहील हे पाहिलं. कायदा समजावा आणि अधिक लोकांपर्यंत पोहोचावा म्हणून त्यांच्या त्यांच्या बोलीत ती माहिती आणण्यासाठी प्रयत्न केला. माहिती पुस्तिका तयार केल्या. त्याचं वाचन त्यांच्याकडून करून घेतलं. जे समजलं नाही, ते समजावून सांगितलं, कायद्याची माहिती प्रत्यक्षात कशी वापरायची त्याचं प्रशिक्षण दिलं.

## चौकटीपलीकडचं प्रशिक्षण

*साधारणत: असं दिसतं की प्रत्येक आदिवासी समूहाशी जोडलेले जडीबुटीवाले वैदू असतात. किमान दोन असतात- एक जनावरांसाठी, एक माणसांसाठी. जडीबुटी, औषधी, उपचार, जादूटोणा असं सगळं ते कमी अधिक प्रमाणात करत असतात. आदिवासी पाड्यावरच्या सगळ्यांना ते ओळखतात आणि पाड्यावरचा हरेक त्यांना ओळखतो. अंधश्रद्धेपोटी त्यांच्या शब्दाला, उपचाराला मान असतो. मुख्य म्हणजे या वैदूंना औषधी वनस्पतींची माहिती असते. त्या जंगलात किती, कुठे, कधी मिळतात हे पक्कं माहीत असतं. हे लक्षात घेत इकोनेटने थोडं चौकटीपलीकडे जायचं ठरवलं. या जडीबुटी देणाऱ्या व्यक्तींचा 'इकोनेट'ने वन हक्काच्या कामात उपयोग करून घेतला. त्यांचं प्रशिक्षण घेतलं. औषधी वनस्पती जंगलात कुठे सापडतात ते त्यांच्याकडून नेमकं समजून घेतलं. त्यांना जी औषधी वनस्पतींची माहिती होती त्याचा उपयोग करून घेतला. त्याची नर्सरी सुरू केली. आदिवासी महिलांना त्याची लागवड परसबागेत करता यावी म्हणून प्रयत्न केले. एवढंच नाही तर औषधी वनस्पती, रानभाज्यांविषयीचं माहितीपर पुस्तकही तयार केलं.*

अर्थात असं प्रशिक्षण व मार्गदर्शनाचं पाठबळ पुरवणाऱ्यांना त्यासाठी स्वत: अभ्यास करावा लागतो, तयारी करावी लागते. 'इकोनेट' याबाबतीत मागे राहिली नाही. वन हक्क कायद्याचा अभ्यास करणं, त्यातले बारकावे समजून घेणं हे इकोनेटची टीम करत होतीच. पण प्रत्यक्षात काय घडतंय, कुठे अडचणी येतायत, का येतात, त्यावर कसे मार्ग काढले जातायत हे पहाणंही महत्त्वाचं

होतं. मेंढा लेखाचं उदाहरण समोर होतं. या गावांनी झगडून वन हक्क मिळवला होता. गडचिरोली–चंद्रपूरमधल्या अनेक ठिकाणचे सामूहिक वन हक्क मंजूर झाले होते आणि त्या आधारे त्यांनी तिथे समृद्धीही आणली होती. त्यांचं उदाहरण तुलनेसाठी घेऊन मग परिस्थिती, वास्तव तपासण्याचं, अभ्यासण्याचं काम केलं. तिथे काय, का, कसं घडलं आणि तसं उर्वरित महाराष्ट्रात घडू शकतं का, तसा बदल घडवायला काय करायला लागेल, ते करता येऊ शकतं का, हे इकोनेटने समजून घेतलं. त्या भागात वर्षानुवर्ष काम करत आलेल्या संस्था, कार्यकर्ते, अभ्यासक यांची याबाबतीत मदत घेतली.

## कुठे पुराव्यांची पाठ, कुठे निस्तार पत्रकांची साथ

*वन हक्क मिळवण्यासाठी दावे करणं आणि दावे सिद्ध करण्यासाठी पुरावे देणं गरजेचं असतं. महाराष्ट्रातल्या बहुतांश भागातल्या आदिवासींकडे कागदपत्रं आणि लेखी पुराव्यांची वानवाच असते. पण चंद्रपूर, गडचिरोलीत थोडा वेगळा अनुभव येतो. का आहे हा फरक? या प्रश्नाचं उत्तर महाराष्ट्रातल्या खास करून नागपूर, गोंदिया, भंडारा, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना लाभलेल्या विशिष्ट पार्श्वभूमीत सापडतं. या भागातल्या आदिवासींना मिळालेले निस्तार हक्क आणि त्यात उल्लेखलेले परंपरागत वन हक्क ही ती पार्श्वभूमी.*

*निस्तार हक्क म्हणजे काय आणि त्याचा नागपूर, गोंदिया, भंडारा, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्हयांशी नेमका काय संबंध आहे? ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि सामूहिक वन हक्क प्राप्त करणारं देशातलं पहिलं गाव ठरलेल्या मेंढा (लेखा)चे शिल्पकार मोहन हिराबाई हिरालाल यांनी त्यांच्या एका लेखात*

*(पुस्तक - आदिवासी काल, आज आणि उद्या, प्रकाशक - आदिम संस्कृती, अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र) याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. ते लिहितात- ''मध्य भारतात जिथे जमीनदारी व्यवस्थेअंतर्गत वनं होती तिथे उर्वरित भागापेक्षा वेगळी प्रक्रिया घडली. घनदाट नैसर्गिक दुर्गम वनं आणि स्थानिक आदिवासींनी केलेला तीव्र विरोध यामुळे इंग्रजांना त्यांची राज्यसत्ता या क्षेत्रात स्थापित करता आली नाही. मध्यस्थ जमीनदारी व्यवस्थेचा स्वीकार करणं त्यांना भाग पडलं. इथले बहुतेक जमीनदार हे आदिवासीच होते. त्यामुळे लोकसमुदायांचे परंपरागत वन हक्क जे 'निस्तार हक्क' म्हणून ओळखले जातात ते १९५१पर्यंत कायम राहिले. जमीनदारी निर्मूलन कायदा १९५१ झाल्यानंतर 'निस्तार हक्क' असलेली सगळी वनं सरकारजमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली, तेव्हा त्या वनांवरील समुदायांच्या परंपरागत निस्तार हक्कांचं काय होणार, असा मोठा प्रश्न निर्माण झाला. नागपूर इथे राजधानी असलेल्या मध्य प्रांत सरकारला जनक्षोभाला सामोरं जावं लागलं. प्रत्येक राजस्व गावाची निस्तार चौकशी करून निस्तार पत्रक बनवून त्यांना कायद्याने सुरक्षितता प्रदान करण्यात आली. आज महाराष्ट्रात असलेले नागपूर, गोंदिया, भंडारा, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे तेव्हा मध्य प्रांतात होते. त्यामुळे या जिल्ह्यातल्या गावांची तेव्हा बनलेली निस्तार पत्रकं ही आजही कायम आहेत. प्रत्येक गावसमुदायाच्या परिसरातील वन आणि सरकारी जमिनीवर असलेले वन हक्क त्यात नमूद केलेले आहेत.'' निस्तार पत्रकांमुळे एका अर्थाने जंगलाचे अधिकारी कोण हे कागदोपत्री नमूद व सुरक्षित झाल्याचं यातून स्पष्ट होतं.*

वन हक्क प्रक्रियेत कागदपत्रं, दस्तावेजीकरण याचं महत्व मोठं. हक्क दाखल करताना पुरावे लागतात. त्यासाठी त्यांचं महत्त्व. ते मिळवण्याचे मार्ग, उपाय यावर खल केला. आणि हे सर्व लक्षात घेत प्रशिक्षण / मार्गदर्शनाचे आराखडे तयार करत नेले. पुराव्यांसाठी, वेगवेगळे दाखले मिळवण्यासाठी गावोगावी कॅम्प लावले. परिस्थिती अशी की आपल्या दुर्गम पाड्यापासून एखाद्या आदिवासी बाईला एखादा सरकारी कागद किंवा दाखला मिळवायला तालुक्याला जायचं तर शंभर–दीडशे रुपये तिकीट खर्चात जातात. गावापासून दोन–तीन किलोमीटर पायी जायचं, मग तालुक्याला नेणारी बस पकडायची. तिथून परत चालत सरकारी ऑफिसपर्यंत. अख्खा दिवस जातो. शिवाय तिथे जाऊन काम होतंच असं नाही. जंगल रस्ता असतो, त्यामुळे परतीला अंधार करून चालत नाही. तालुक्याच्या ठिकाणाहून लवकर निघावं लागतं. काम नाही झालं तर खेटे घालण्याखेरीज पर्याय उरत नाही. दिवसाची मजुरी बुडते ती बुडतेच, शिवाय पदरचे पैसे जातात तो जास्तीचा भुर्दंड. यावर उपाय काढणं अत्यावश्यक होतं. हे टाळून दाव्यांसाठीचे पुरावे, सरकारी कागद आदिवासींना मिळवून देणं गरजेचं होतं. कॅम्प लावण्याचा उपाय लागू पडला. दाव्यांसाठी असे बरेच कष्ट करावे लागले, इकोनेटलाही आणि स्थानिक संस्था व कार्यकर्त्यांनाही. मग ते दावे, पुरावे वैयक्तिक हक्कासाठी असोत वा सामूहिक... किनवटच्या काजीपोडमधले असोत वा इगतपुरीतल्या कुरूंगवाडीतले, धारणीतल्या रंगूबेलीतले असोत की जव्हारमधल्या कासटवाडीतले!

वन हक्क कायद्याची प्रक्रिया करताना बरेच टप्पे पार करावे लागतात. यात अंमलबजावणी आदिवासी विभागाची आणि दावा मान्यतेचा अधिकार वन विभागाकडे तसंच दावा मंजुरी ही समित्यांकडे अशी रचना आहे. त्यामुळे बऱ्याचदा संघर्ष होतो तो वन विभागाशी. पण आता ज्या भागात या हक्काविषयी

जाणीव जागृती पुरेशा प्रमाणात झालीय तिथे ग्रामसभेला वन विभागाचे लोकही येतात, विषय समजून घेतात असा बदल घडू लागला आहे. इकोनेटचं प्रकल्प क्षेत्र असलेल्या जव्हारच्या कासटवाडी ग्रामपंचायत परिसरात हे अनुभवायला मिळू लागलं आहे. केवळ वन विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळणं एवढ्यापुरताच इथला बदल मर्यादित नाही. इथे मोठ्या प्रमाणावर असलेल्या वारली समाजाची वणवण वन हक्क कायद्याच्या रेट्यामुळे कमी होत असल्याचंही दिसून येत आहे.

महाराष्ट्रातल्या आदिवासींच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सारं आयुष्य संघर्षात्मक व रचनात्मक कामात झोकून देणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कुमार शिराळकर यांनी आदिवासींच्या जगण्याशी अन्योन्यपणे जोडलेली वणवण, स्थलांतर व शोषण याबाबतच त्यांची निरीक्षणं पुढील शब्दांत नोंदवून ठेवली आहेत – ''आदिवासी शेतकऱ्यांपैकी ८१ टक्के शेतकरी पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतीच्या छोट्याशा तुकड्यावर शेती करणारे शेतकरी आहेत. बहुसंख्य आदिवासींना उपजीविकेसाठी मिळेल त्या मोलमजुरीत काम करायला लागतं. पायाभूत सुविधांची उभारणी, बांधकाम उद्योग, वनीकरण, खाणी, रासायनिक–अवजड उद्योग, ऊस तोडणी, खडीकाम, वीटभट्टी, मिठागरं, वाळू उपसा, मच्छीमारी, हमाली, मोलमजुरी अशा श्रमाच्या क्षेत्रात आदिवासी राबतात. संघटित उद्योग क्षेत्रात आणि असंघटित क्षेत्रात आदिवासी अकुशल कामगार म्हणूनच काम करतात. कायम कामगार म्हणून यांच्यापैकी क्वचितच काही जणांना कुठेतरी काम मिळतं. 'ठेकेदारांकडचे मजूर' असं सामान्यतः त्याचं स्वरूप असतं. कोणत्याही कामासाठी स्वस्त दरात उपलब्ध होणारे मजूर म्हणूनच त्यांना कुठेही नेलं जातं. ठेकेदार सावकारांकडून कर्ज काढून 'ॲडव्हान्स' घेऊन ते नेतील तिथे वेठबिगारी करण्याशिवाय दुसरा

पर्याय आदिवासींना सामान्यत: उपलब्ध नसतो. उपजीविकेसाठी रोजगार शोधत घरापासून, गावापासून दूर आणि दीर्घकाळासाठी दरवर्षी स्थलांतर करणं ही आदिवासींची नव्या वेठबिगारीची जीवनशैलीच जणू झाली आहे. पिढ्यान् पिढ्या तेच तेच अति कष्टाचे शारीरिक श्रम करणं त्यांना भाग पडतंय. ठेकेदारी मजूर निर्मूलन कायदा, किमान वेतन कायदा, नुकसान भरपाई कायदा, आंतरराज्य स्थलांतरित कामगार कायदा यापैकी कोणत्याही कायद्याचं त्यांना सामान्यतः संरक्षण मिळत नाही. या कामगारांची नोंद कुठेही केली जात नाही. जागतिकीकरणामुळे रोजगार मिळण्याची शक्यता काही विशिष्ट क्षेत्रात निर्माण झाली, पण त्यासाठी लागणारं प्रशिक्षण, कौशल्य आणि विकसित ज्ञान यापासून बहुसंख्य आदिवासी पूर्णपणे वंचित आहेत.''

जगण्याचे आधार तुटत असताना, जागतिकीकरणाच्या रेट्यातून शोषणाचा पीळ आणि पोत असा बदलत असताना आदिवासी समाजाची वणवण कमी करण्यासाठी जर जव्हारसारख्या आदिवासीबहुल क्षेत्रात वन हक्कांची अंमलबजावणी उपयोगी पडत असेल तर त्याचं महत्त्व निश्चितच खास आहे.

## 'इकोनेट'च्या पालघर जिल्ह्यातल्या प्रकल्पक्षेत्राची वैशिष्ट्यं

*पालघर जिल्ह्यामध्ये जव्हार तालुक्यातली कासटवाडी (गाव/पाडा /वस्ती/तांडा-जयेश्वर, रामनगर) ही ग्रामपंचायत 'इकोनेट'ने प्रकल्पक्षेत्र म्हणून निवडली आहे.*

*पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याचा उत्तरेकडचा आदिवासीबहुल भाग नवनिर्मित पालघर जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आलाय. त्यामुळे पालघर या नव्या जिल्ह्याचं रुपडं प्रामुख्याने आदिवासी आहे. पालघर व वसई या तालुक्यांमधल्या काही गावांचा समावेश*

*पाचव्या अनुसूचीमध्ये करण्यात आलाय, तर डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा हे तालुके पूर्णपणे अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आलेत.*

*पालघर जिल्ह्यातल्या एकूण लोकसंख्येमध्ये अनुसूचित जमातींचं प्रमाण ३७.३९ टक्के आहे. इथल्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी या तालुक्यांमध्ये हे प्रमाण नव्वद टक्क्यांहून अधिक आहे. आदिवासीबहुल तालुक्यांमधल्या ग्रामीण भागातली साधारण ७० टक्के कुटुंबं दारिद्र्यरेषेखाली आहेत. साक्षरतेचं प्रमाण इथे संपूर्ण लोकसंख्येसाठी ८५ टक्के आहे, तर अनुसूचित जमातींमध्ये हे प्रमाण ५९ टक्के इतकं कमी आहे. पालघर जिल्ह्यात कोकणा, महादेव कोळी हे आदिवासी समुदायही आढळतात; पण वारली हा इथला प्रमुख आदिवासी समाज आहे.*

वारली या इथल्या आदिवासी समाजाचं वनाशी अत्यंत जवळकीचं नातं आहे. जंगलावर प्रचंड अवलंबित्व असल्याने वन हक्क मिळण्याचं महत्व यांच्या दृष्टीने विशेष आहे. वारली लोक जंगलाला एकदम लागून राहतात. म्हणजे अगदी वनानजीक! यांच्याकडे वैयक्तिक खासगी शेती जवळपास नाही. पोटपाणी सगळं जंगलावर आणि वनोपजेच्या भरवशावर! एकदा दसरा दिवाळी झाली की हे लोक कामाला जातात. बाहेर. वीटभट्टीवर वगैरे. मग पाऊस चालू झाला की गावात, पाड्यावर, घरी परततात. इथे आल्यावर परत जास्तकरून इतरांच्या शेतावर मजुरीला जातात. राबणी झाल्यावर जेव्हा पिकं लावायला येतात तेव्हा यांना शेतामधे मजुरीचं काम मिळतं. असं काम जिथे मिळत राहातं, रोजगार हमीचं काम जिथे असतं, जिथे लोकांना सतत आणि चांगली कामं मिळतात तिथे लोक टिकतात असं आढळतं. आदिवासीबहुल जव्हारच्या

ज्या भागात वनपट्टे मिळाले, दावे मंजूर झाले तिथलं स्थलांतराचं प्रमाण लक्षणीय कमी झालं आहे. त्यांची पोटासाठी करावी लागणारी वणवण कमी होण्यास त्यातून मदत झाली आहे. अपरिहार्यतेपायी गाव सोडून बाहेर गेल्यावर होणारी फरफट, नाडवणूक अनेकांनी अनुभवली आहे. जंगलावर आपण किती अवलंबून आहोत हे लक्षात आल्याने त्याच्या संरक्षणाची जबाबदारी आता अनेक ठिकाणी घेतली जात आहे. सरधोपट वनीवरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचं धाडस दाखवलं जात आहे. जंगलातलं वैविध्य जपायला प्राधान्य दिलं जात आहे.

## सरसकट वनीकरणावर प्रश्नचिन्ह

*वनीकरण करण्यापूर्वी वन खात्याच्या लोकांनी स्थानिक आदिवासी समूहाची परवानगी न घेणं, कुठली झाडं लावायची ते न विचारणं-न सांगणं हे सरेआम घडायचं. पण आता ज्या गावात दाव्यांचं काम मार्गी लागू लागलं आहे, जिथे जाणीव जागृती पुरेशी झाली आहे, हिंमत वाढली आहे तिथे तसं होत नाही.*

*आता तिथे लोक प्रश्न विचारू लागले आहेत, समुचित पर्याय सुचवू लागले आहेत. 'जास्त पाणी पिणारी, सावली न देणारी, मातीची वाट लावणारी झाडं आम्हाला नकोत. आमच्या जगण्याला उपयोगाची झाडं लावा. इथल्या जमिनीत, हवापाण्यात नैसर्गिक रुजणारी वाढणारी झाडं लावा!' असं ठामपणे वन विभागाच्या लोकांना सांगू लागले आहेत. वन पट्ट्यात जिथे नवं जंगल तयार झालंय ते वनीकरणाच्या जंगलापेक्षा जास्त चांगलं आहे हे प्रत्यक्ष दिसतंय. ते आता वन विभागाला पटवायची गरज उरलेली नाही. आदिवासींना चोरून*

*जंगलातून काही आणावं लागत नाही. जंगल त्यांचंच झालं आहे, त्यामुळे ते त्याचं आपुलकीने संरक्षण आणि संवर्धन करतायत असं दिसू लागलंय.*

आदिवासी लोक २००६ पूर्वी जल, जंगल, जमिनीचा त्यांच्या निव्वळ दैनंदिन उपजीविकेसाठी जेव्हा वापर करायचे तेव्हा वेगवेगळ्या कायद्यांखाली ते 'अतिक्रमण' मानलं जायचं. आदिवासींना बोलणी खावी लागायची, दंड द्यावा लागायचा, केसेस घातल्या जायच्या त्याला तोंड द्यावं लागायचं, व्यवस्थेची नजर चुकवत लपून छपून जंगलातून जे आणि जेवढं मिळेल त्यावर जगणं भागवावं लागायचं, 'गुन्हेगार' म्हणून शिक्का बसेल या भीतीच्या छायेत जगावं लागायचं. वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीला ज्या ज्या भागात रेटा मिळाला, तिथे हे चित्र बदलण्यास पूरक वातावरण निर्माण होत गेलं. जनजागृती झाली, प्रशिक्षणं घेतली गेली, क्षमता विकास होत गेला आणि त्या जोरावर लोकांनी रचनात्मक काम व संघर्ष याची सांगड घालत बदल घडवून आणला. अर्थात जेव्हा नवी पावलं पडू लागतात तेव्हा समोरचा मार्ग साधा सोपा सरळसोट असतोच असं नाही. असा काहीसा अनुभव अमरावती जिल्ह्यातल्या प्रकल्प क्षेत्रात येत असल्याचं जाणवतं.

इथल्या रंगूबेली, बैरागड अशा ठिकाणी वन विभागासोबतचा संघर्ष वर्षानुवर्षं चालू आहे. प्रचंड गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि जंगलावरचं अपरंपार अवलंबित्व. त्यामुळे जगण्यासाठी वनात जाण्याखेरीज पर्याय नाही अशी परिस्थिती. पण वनात जायचं तर अवतीभवती कायद्याचा बडगा उगारणारी व्यवस्था.

## ‘इकोनेट’च्या अमरावती जिल्ह्यातल्या प्रकल्पक्षेत्राची वैशिष्ट्यं

*अमरावती जिल्ह्यामध्ये धारणी तालुक्यातल्या पुढील ग्रामपंचायती ‘इकोनेट’ने प्रकल्पक्षेत्र म्हणून निवडल्या.*

*रंगूबेली (गाव/पाडा/वस्ती/तांडा - धोकडा, खामदा, किन्नीखेडा, रंगूबेली)*

*बैरागड (गाव/पाडा/वस्ती/तांडा - कोमडाढाणा, टंगटंगढाणा)*

*चटवाबोड (गाव/पाडा/वस्ती/तांडा - कसाईखेडा)*

*कुटंगा (गाव/पाडा/वस्ती/तांडा - हरदा, सावळखेडा)*

*गेली किमान तीन दशकं महाराष्ट्रातला अमरावती जिल्हा मेळघाटातल्या अतीव कुपोषणाच्या समस्येमुळे चर्चेत आहे. इथल्या १४ तालुक्यांपैकी धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यांचा समावेश पाचव्या अनुसूचीत करण्यात आलाय. महत्त्वाचं म्हणजे, हे दोन्ही तालुके पूर्णपणे अनुसूचित क्षेत्रातील तालुके म्हणून घोषित करण्यात आलेत. सातपुडा पर्वताच्या रांगांमध्ये पहुडलेल्या या भागात कोरकू आणि गोंड या दोन अनुसूचित जमातींची मोठी संख्या आहे. प्रकल्प क्षेत्र म्हणून निवडलेली गावं ही पूर्णांशाने आदिवासी गावं आहेत. विकासापासून कोसो दूर असलेल्या या गावांतील लोकांचं जीवन केवळ कष्टाने भरलेलं आहे. इथे शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावरच केली जाते. पावसाळा संपल्यानंतर पोटासाठी कामाच्या शोधात मध्य प्रदेशात आणि जिल्ह्याच्या -राज्याच्या इतर भागांमध्ये स्थलांतर करण्याचं प्रमाण मोठं आहे. मेळघाट व्याघ्रप्रकल्पाच्या निसर्गसुंदर कुशीत धारणी तालुका वसलेला*

*आहे. व्याघ्रप्रकल्प घोषित झाल्याने वन हक्क आणि वन्यजीव संरक्षण अशा कात्रीतून वाट काढत पुढे जाण्याची कसरत इथे करावी लागते.*

किमान माणसासारखं आणि ताठ मानेने जगता यावं म्हणून दोन वेळच्या जेवणाची भ्रांत मिटायला हवी, शिक्षण हवं, नोकरी/व्यवसाय हवा, अगदीच ते नाही तरी रस्ते–पाणी–विजेसारख्या मूलभूत गरजा तरी पूर्ण व्हायला हव्यात. या भागात आजवर या गरजादेखील भागवल्या गेलेल्या नाहीत. हा भाग व्याघ्रप्रकल्पात येतो. त्यामुळे इथे वन्यजीव संरक्षण कायदा लागू होतो. इथे रस्ते काढता येत नाहीत. विहिरी खोदता येत नाहीत, विजेचे खांब उभारले जात नाहीत की शेताला कुंपणं घालता येत नाहीत. तिथल्या स्थानिक आदिवासींचं सरसकट विस्थापन हा काही यावरचा 'उपाय' असू शकत नाही. हा काही फक्त इकोनेटच्या प्रकल्प क्षेत्रातला किंवा केवळ अमरावतीतला, धारणीच्या रंगूबेलीतला प्रश्न नाही. भारतभरात जिथे जिथे वन हक्क आणि वन्यजीव संरक्षण हे दोन कायदे लागू होतात तिथे तिथे अशी दुहेरी कात्रीत सापडल्यासारखी परिस्थिती निर्माण होताना दिसते आहे. ही गुंतागुंत कशी सुटणार, इथल्या प्रश्नांवर कधी आणि कसा तोडगा निघणार याविषयीचं चित्र स्पष्ट नाही. पण स्थानिक संस्थांचे कार्यकर्ते आणि त्यांना इकोनेटने प्रशिक्षण व मार्गदर्शनाचं दिलेलं पाठबळ या जोरावर वन हक्क कायद्याची अमलबजावणी होत असल्याने किमान त्यांना जंगलात चोरीछुपे जावं लागत नाही, दंडुके खावे लागत नाहीत. रस्ते, वीज नसली तरी किमान जल, जंगल, जमिनीवर तरी ते आता 'अधिकार' सांगू शकतात. इथले अनुभवी कार्यकर्ते म्हणतात– 'वनावर, जमिनीवर तरी अधिकार मिळालाय; नाहीतर इथले आदिवासी कुठे गेले असते? त्यांनी काय केलं असतं? या कायद्यामुळे तरी निदान अधिकारी दबून आहेत. नाहीतर आम्हाला फार त्रास झाला असता.'

सन्माननीय अपवाद वगळता वन विभागाच्या लोकांशी बहुसंख्य आदिवासी लोकांचं जुळत नाही असं आढळतं. त्यांच्यात बहुतेकदा चोर–पोलीसाचं नातं असल्याचं जाणवतं. 'फॉरेस्टवाल्यांकडून आमच्या उपयोगाची, हिताची माहिति किंवा मार्गदर्शन आम्हाला कधीच मिळत नाही' असं जवळपास सगळीकडचे आदिवासी सांगतात. नाशिकच्या कुरुंगवाडीत मात्र फक्त वन विभागाकडूनच नाही तर खुद्द ग्रामसेवक, सरपंच, पोलिस पाटील, तलाठी कुणाकडूनच सर्वसामान्य आदिवासींना कशाची माहिती मिळायची नाही अशी गत. साटंलोटं, अडाणीपणा, नाडवणूक ही वस्तुस्थिती. इथे जेव्हा काम करायचं ठरलं तेव्हा सुरुवातीला स्थानिक 'बहुजन विकास' संस्थेसोबत इकोनेटने जोडून घेतलं.

## 'इकोनेट'च्या नाशिक जिल्ह्यातल्या प्रकल्पक्षेत्राची वैशिष्ट्यं

*नाशिक जिल्ह्यामध्ये इगतपुरी तालुक्यातल्या पुढील ग्रामपंचायती 'इकोनेट'ने प्रकल्पक्षेत्र म्हणून निवडल्या.*

*कुरुंगवाडी (गाव/पाडा/वस्ती/तांडा - कुरुंगवाडी)*

*वासाळी (गाव/पाडा/वस्ती/तांडा - सांबरवाडी, वासाळी)*

*आंबेवाडी (गाव/पाडा/वस्ती/तांडा - आंबेवाडी, नांदुरकीची वाडी)*

*भावली (गाव/पाडा/वस्ती/तांडा - धामडकी, गवांदे धिारवाडीं)*

*इंदोरे (गाव/पाडा/वस्ती/तांडा - इंदोरे)*

*खडकेद (गाव/पाडा/वस्ती/तांडा - खडकेद)*

*खेड (गाव/पाडा/वस्ती/तांडा - देवाची वाडी, काननवाडी, खेड, ठाकूरवाडी)*

*मानवेढे (गाव/पाडा/वस्ती/तांडा - जामुंडे)*

*सातपुडा पर्वताच्या कुशीतला नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेकडचा भाग हा डोंगराळ आणि आदिवासींची मोठी संख्या असलेला आहे. पेठ, सुरगाणा व कळवण हे पाचव्या अनुसूचीमध्ये पूर्णांशाने समावेश केलेले तालुके आहेत. इगतपुरी, दिंडोरी, त्रिंबकेश्वर, बागलाण, देवळा या तालुक्यांमधील काही गावांचा समावेश पाचव्या अनुसूचीमध्ये केलेला आहे. इगतपुरी तालुक्यात मुख्यतः महादेव कोळी आणि महादेव ठाकूर या अनुसूचित जमाती आढळतात. कोकणा आदिवासींची संख्या इथे तुरळक आहे.*

नाशिक जिल्ह्यामधल्या इगतपुरी तालुक्यातल्या कुरूंगवाडीच्या अतिदुर्गम भागात २०१३ पासून इकोनेटचं काम सुरू झालं. रस्ता नाही, वीज नाही. आठ–दहा किलोमीटर वाट तुडवत जावं लागायचं. नदीनाल्याचा रस्ता होता. नुसता चिखल असायचा. पूल नव्हते. पावसाच्या दिवसात तर नदीच्या पलिकडे गेलं की तिकडेच अडकून पडलं असंही व्हायचं. इथली भौगोलिक परिस्थिती, समाजकारण–राजकारण आणि एकंदर इथल्या आदिवासींच्या जगण्याचा पोत समजून घेणं हे आवश्यक होतं. म्हणून मग वन क्षेत्र, वन हक्क किंवा एकूणच वन हक्क कायदा याविषयी त्यांना काही माहिती आहे का, ते समजून घेण्याची त्यांची इच्छा आहे का, ग्रामसभेत वन हक्काचा विषय कधी येतो का याची आधी चाचपणी केली गेली. तिथल्या काम करणाऱ्या संस्था, स्वयंसेवी तरुण, महिला यांच्याशी जाळं विणून वन हक्क अमलबजावणीला रेटा द्यायचा होता. हक्काधारित विचाराच्या या लढाईत अभ्यास, मार्गदर्शन, प्रशिक्षण व सक्षमीकरण याचं पाठबळ इकोनेट संस्था सतत देत राहिली. पण इकोनेटने ज्या ज्या ठिकाणी वन हक्काचं काम केलं तिथे स्थानिक लोक, स्थानिक संस्था यांचं बळकटीकरण सदैव महत्त्वाचं मानलं. वन हक्काच्या

अमलबजावणीला रेटा मिळावा म्हणून इकोनेट विचार पेरत गेली, पण तो विचार पुढे घेऊन जाणारे स्थानिक कार्यकर्ते, स्थानिक नेतृत्व घडावं, सक्षमपणे पुढे यावं यासाठी इकोनेटने अगदी पहिल्यापासून आणि जाणीवपूर्वक प्रयत्न केला. काम सुरू करताना परिस्थिती समजून घेतल्यावर मग प्रशिक्षणाचा टप्पा होता. प्रशिक्षणांची, तिथल्या कार्यकर्त्यांच्या क्षमता वाढीची जबाबदारी इकोनेटने घेतली.

कुरूंगवाडी या साधारण चौदाशे–पंधराशे लोकसंखेच्या गावात २०१२–१३ मध्ये इकोनेटने जेव्हा काम चालू केलं तेव्हा तिथे वीज नव्हती, रस्ताही नव्हता. इतर ठिकाणांसारखेच इथेही सर्वसामान्य आदिवासी फॉरेस्टवाल्यांना घाबरून असायचे. 'जंगल आमचं आहे पण फॉरेस्टवाले आमच्यावर हुकूमत गाजवतात' असा आदिवासींचा अनुभव आणि फॉरेस्टवाले म्हणायचे की 'वनाचं रक्षण करणं आमचं काम आहे आणि तेच आम्ही करतोय!' म्हणजे वर्षानुवर्ष आपल्याकडे वन खात्याचे लोक आणि आदिवासी समुदायाचे लोक यांच्यात एकप्रकारचं अविश्वासाचं नातं आहे. हे नातं पारदर्शक, विश्वासाचं आणि परस्परपूरक कसं होईल हे पाहणं हे इकोनेटने महत्त्वाचं मानलं. कुणी मोठा नाही, कुणी लहान नाही, आपण एकमेकांचे शत्रू नाही हे त्यांना पटवून देणं महत्त्वाचं होतं. वनाचं रक्षण आणि संवर्धन हे आपल्या दोघांचं काम आहे याविषयीची दोन्ही बाजूची समज वाढवणं गरजेचं होतं. म्हणून मग आदिवासी समाजाची या कायद्याच्या संदर्भातली जागृती घडवून आणतानाच स्थानिक वन क्षेत्रपालांशी बोलणं, त्यांची प्रशिक्षणं घेणं हे काम इकोनेटने केलं. आदिवासी विभागातल्या लोकांशी संपर्क आणि संवाद साधण्याचं कामही महत्त्वाचं होतं. वन क्षेत्राच्या संदर्भाने कुठली कामं करायची आहेत, कुठली कागदपत्रं गरजेची आहेत, फाइल कुठे द्यायची आहे, नोडल एजन्सी कुठे आहे, त्यांची काय भूमिका आहे, तिथे प्रशिक्षणं कुणी देतंय का, नसेल तर इकोनेट

प्रशिक्षण देईल असं करत संपर्क आणि संवादातून व्यवस्थेलाही या बदलाच्या प्रक्रियेत सामावून घेतलं गेलं.

गावात लोकांसोबत काम सुरू केलं तेव्हा पहिल्यांदा जंगल 'आपलं' आहे हे त्यांच्या मनावर ठसवण्यासाठी मेहनत घ्यावी लागली. त्यांना घेऊन जंगल पाहणी केली, जंगलात काय आहे – किती आहे–कुठे आहे– कसं आहे हे पाह्यलं. हे करताना स्थानिक शाळा, शिक्षक, अंगणवाड्या, शिकलेसवरले लोक, युवक गट, शेतकरी, महिला बचत गट यांना सामावून घेतलं. हे सगळे स्वयंस्फूर्तीने सामील झालेले स्वयंसेवकच होते.

## महिलांची धडाडी

*सुरुवातीला प्रकल्प क्षेत्रांमध्ये जेव्हा मीटिंग व्हायच्या तेव्हा त्याला अगदी असलीच तर एखाद दुसरीच महिला उपस्थित राहायची. त्या भागांमध्ये ना महिला ग्रामसभा व्हायची, ना महिलांचे गट होते. पण जसजशी जागृती वाढायला लागली तसतशी पाड्यांवर चर्चा होऊ लागली. मग महिलाही थोडाबहुत पुढाकार घेऊ लागल्या. बोलू लागल्या. त्यांच्यासाठी परसबागेसारखे काही उपक्रम राबवले गेले. त्यातून आपोआप गट तयार झाले, बायका एकत्र आल्या. मग सुधारित चुलीचा प्रकल्प राबवला. वन संरक्षण आणि महिलांचं आरोग्य या दोन्ही मुद्यांची सांगड घालत या उपक्रमात अधिक महिलांना सहभागी करून घेतलं गेलं. हळूहळू मग सेंद्रिय शेती करणाऱ्यांचा, भाजी विक्रेत्यांचा, पारंपरिक नृत्य करणाऱ्यांचा असे महिलांचे वेगवेगळे गट तयार होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यातून एकत्र येणं, बोलणं, प्रश्न सोडवणं असं घडू लागलं. अनेक ठिकाणी केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांच्या*

*पलीकडचा सहभाग महिला दाखवू लागल्या. कुठे महिलांनी गावात दारूबंदी घडवून आणली, कुठे हंडा मोर्चे काढून पाण्याचा प्रश्न उठवला तर कुठे बंधारे बांधून तो सोडवला, कुठे महासंघ उभा करून आपलं बळ वाढवलं, जंगलातले बांबू तोडून नेणाऱ्या ठेकेदाराचे ट्रक अडवायची हिंमत दाखवली तर कुठे ग्रामसभेत आपल्या अस्तित्वाची आणि प्रश्नांची दखल घ्यायला लावली.*

जंगल पहाणीचा पुढचा टप्पा म्हणून गाव पातळीवर मग एक समिती तयार केली गेली. यात युवक, महिला, पंचायत सदस्य असे वेगवेगळे लोक होते. त्यांना प्रशिक्षण दिलं गेलं. त्यांची या विषयातली उत्सुकता, उत्साह आणि समज वाढत गेली. काही गळले, काही टिकले, पुढे आले. या पुढे आलेल्या लोकातून मग वन हक्कावर काम करणारी स्थानिक समिती आकाराला आली, सक्षम होत गेली. या समितीची क्षमता वाढण्यासाठी पुण्यात प्रशिक्षण घेतलं गेलं. वेगवेगळ्या संस्थांना भेटी घडवल्या. त्यांचं काम पाहिलं. काही वाचन साहित्य दिलं गेलं. पुस्तकं, दस्तावेज दिले गेले अभ्यासासाठी. आधीच्या प्रशिक्षणात जे कळलं नसेल ते पुन्हा समजून घेण्यासाठी, त्यात भर घालण्यासाठी, वाचन–साहित्यावर चर्चा करून विषय नीट समजून घेण्यासाठी पुन्हा प्रशिक्षणं दिली गेली. वन हक्क कायदा अमलात आणण्याचा म्हणजे दावे दाखल करणं, पुरावे गोळा करणं, ते मंजूर होण्यासाठी धडपड करणं हे आलं. म्हणजे कोणती फाइल, कुठल्या ऑफिसात, कशी आणि कुणाकडे दाखल करायची हे लक्षात यायला हवं. म्हणून मग आदिवासी विभागापासून अनेक स्थानिक शासकीय कार्यालयांच्या भेटी आयोजित केल्या गेल्या. असं सगळं केल्यावर मग प्रत्येक गावाची एक फाइल बनवली गेली. गावचा नकाशा, जंगलाचा नकाशा, जंगलात काय काय आहे (दाट झाडी, खुरटी झुडपं, पाण्याचे स्त्रोत, वनस्पती कुठल्या

आहेत, गुरं चरायच्या जागा कोणत्या, फॉरेस्टकडून नवीन लागवड कुठे केली, रोजगार हमीची कामं कुठे होतायत, चोरीची पाऊलवाट कुठून कुठपर्यंत आहेत, पाणथळ कुठे आहे इत्यादी) याच्या नोंदी असं सगळं त्यात घेतलं. ग्रामसभा घेतली गेली. गावापुढे हा विषय मांडला गेला. पूर्ण गावापुढे गावाचा नकाशा तयार करण्यात आला. गावालाच हा नकाशा काढायला लावला. आधी काढलेल्या नकाशात जे राहिलं होतं ते त्यात भरलं, काही नोंदी चुकल्या होत्या त्या दुरुस्त केल्या गेल्या. गावाने जंगलाचा नकाशा बनवल्यामुळे त्या आदिवासी गावकऱ्यांच्या लक्षात आलं की आपल्या जंगलात कुठे काय काय किती आहे ते! मग तेच म्हणायला लागले की 'हक्क' मिळवायला पाहिजे!

## सर्वांगीण बदल

*वन हक्क कायद्याच्या अमलबजावणीतून सर्वसामान्य आदिवासींना जमिनीवर, जंगलावर अधिकार मिळाला. शिवाय सर्वांगीण विकासासाठी पावलं टाकायचं कायदेशीर बळ मिळालं. कुणापुढे हात पसरावे लागत नाहीत, की सरकारी परवानगीसाठी खेटे घालावे लागत नाहीत. पूर्वी वनक्षेत्रात वसलेल्या गावांना साध्या मानवी सोयीसुद्धा मिळत नसत. शाळा बांधायची किंवा रस्ता बांधायचा तरी 'केंद्र सरकारकडून वनसंवर्धन कायद्याखाली परवानगी आणा' असं सांगितलं जात असे. वन क्षेत्रात कुठलीही मूलभूत गरजेची आणि विकासाची कामं होण्यात हा मुख्य अडथळा असायचा. पण वनहक्क कायद्यात सोपी तरतूद करण्यात आली आहे. गावाच्या गरजेच्या १३ सुविधांची त्यात यादी आहे. ग्रामसभेने ठराव केल्यानंतर या सुविधांचं बांधकाम करता येतं. हे बहुसंख्य आदिवासी लोकांना ठाऊक असण्याची काही शक्यताच*

*नव्हती. पण या कायद्याच्या संदर्भातली प्रशिक्षणं होत गेली तशी प्रकल्प क्षेत्रात त्यासाठी प्रयत्न केले गेले. अनेक ठिकाणी विहिरी आणि शेततळ्यांचं काम झालं. लोकांनी रस्ता, पाण्याची सोय होईल असं पाहिलं. इतकंच नाही तर अगदी विजेचे खांब उभारण्यापासून शाळा बांधण्यापर्यंत अनेक बाबी झटून पूर्णत्वाला नेल्या.*

मग हक्क मिळवायचा कसा, हा प्रश्न त्यांच्याकडूनच आला. सगळे दस्तावेज, पुरावे गोळा करणं याची गरज त्यातून त्यांना कळली. ग्रामसभा ठराव, तलाठी कार्यालयातून दस्तावेज मिळवणं, जंगलाचा नकाशा, वन क्षेत्र नेमकं किती हे नोंदवणं, अर्ज व्यवस्थित भरणं, ग्रामसभेने वन हक्क समिती नेमणं, वन हक्क समितीने ग्रामसभेच्या संमतीने जबाबदारीने काम करणं, तालुका–जिल्हा अशा वेगवेगळ्या पातळीवरच्या समित्या काय काम करतात हे मग प्रशिक्षणाद्वारे, क्षमता–विकास कार्यक्रमाद्वारे समजावून सांगितलं गेलं. दुसरीकडे सरकारी कार्यालयात काम करणाऱ्यांपर्यंत कायद्याची माहिती पोहोचवणं, त्यांना समजावून सांगणं, पटवून देणं हेदेखील काम गरजेनुसार इकोनेटने केलं. नाशिकमधलं सामूहिक वन हक्क इकोनेटच्या सहकार्यातून मिळवणारं कुरूंगवाडी हे पहिलं गाव. तेव्हा सुरुवातीच्या धडपडीतून पासष्ट हेक्टर वन क्षेत्र मिळालं होतं. आता अधिक रेटा, दमदार पाठपुरावा आणि अधिक प्रयत्नाच्या जोरावर शंभर हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवर सामूहिक वन हक्क प्रस्थापित झालाय तिथे!

अर्थात काम थांबलेलं नाही. एका गावाचं बघून दुसरं गाव स्फूर्ती घेतंय, एका पाड्याचे प्रश्न सुटतायत हे पाहून दुसरा एखादा पाडाही प्रयत्नासाठी पुढे येताना दिसतोय. जाणीवजागृती, क्षमता विकास, प्रशिक्षणासाठी पावलं पडतच आहेत

अथकपणे. कदाचित पूर्वीपेक्षा अधिक अभ्यासपूर्ण आणि अधिक हिमतीने! या प्रक्रियेत आदिवासी सजग, सतर्क होणं, त्यांनी दावे दाखल करणं, ते मंजूर होण्यासाठी जीवाचं रान करणं ही निष्पत्ती आहेच. पण नाशिक, पालघर, नांदेड, अमरावतीच्या आदिवासीबहुल पेसा क्षेत्रातले सर्वसामान्य तरुण व महिला पुढे येणं, हक्काधारित विचाराने काम करणारं स्थानिक नेतृत्व त्यातून सक्षम होणं ही खास आणि महत्त्वाची गोष्ट इथे घडताना दिसते आहे!

## संरक्षण, संवर्धन, विकास

*कायद्याचा आधार घेऊन वन हक्क मिळवला की त्यानंतर तिथला विकास लोकांनीच घडवून आणायचा असं अभिप्रेत आहे. इकोनेटने आपल्या प्रवासात हे कायम लक्षात घेतलं आणि आपल्या हरेक कार्यक्षेत्रात अमलात आणू पाहिलं. दावा मंजूर झाल्यावर मिळालेल्या वन क्षेत्राची जोपासना, विकास आणि संवर्धन करण्याची जबाबदारी आपली आहे हे आदिवासी समूहांना समजावणं, पटवून देणं इकोनेटने महत्त्वाचं मानलं. जंगल वाचलं तर समुदाय वाचेल हे अधोरेखित करण्यासाठी मग इकोनेटने पुढचं पाऊल उचललं ते वन क्षेत्राचा विकास आणि त्यासाठी वन हक्क कायद्याला पूरक ठरतील असे वन्य जीव संरक्षण कायदा, जैव विविधतेसंदर्भातला कायदा अशा वेगवेगळ्या कायद्यांची ओळख करून देण्याचं. आपल्याला कायद्यानुसार काम करायचं आहे त्यामुळे वनात राहताना, त्यावर आपला अधिकार सांगताना वन हक्क आणि इतर कायद्यांचीही आपण जाणीव ठेवली पाहिजे, त्याचा आधार घेत आपलं वन क्षेत्र वाचवलं पाहिजे आणि त्याचं संवर्धन केलं पाहिजे हा विचार पोहोचवण्यावर, रुजवण्यावर, ठसवण्यावर इकोनेटने*

*भर दिला. त्यामुळे एकीकडे दावे दाखल करणं, ते मंजूर व्हावेत म्हणून जीवतोड मेहनत घेणं चालू असतानाच वन प्रजातींचं संरक्षण आणि शाश्वत वनसंपत्ती व्यवस्थापन याविषयी समाजाला जागरूक करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले. आपलं गौण वनोपजेवरचं अवलंबित्व किती आहे हे गांभीर्याने समजावून सांगण्याचं आणि या प्रजातींच्या पुनरुत्पादनासंदर्भात विचार व कृती करायला प्रवृत्त करण्याचं कामही स्थानिक संस्था-कार्यकर्त्यांच्या सहाय्याने जाणीवपूर्वक केलं गेलं. त्यातून पुढे इकोनेटच्या प्रकल्प क्षेत्रात शक्य त्या सर्व ठिकाणी स्थानिक गौण वन उपज प्रजातींच्या बीज बँका व रोपवाटिका विकसित केल्या गेल्या. जंगलातल्या गौण उपजेची शाश्वत पद्धतीने कापणी, त्याचं श्रेणीकरण व मूल्यवर्धन करणं, बांबूवर आधारलेल्या हस्तकलेचं प्रशिक्षण-प्रोत्साहन व विक्री व्यवस्था तयार करणं यासाठीही पावलं उचलली गेली. नर्सरी विकास व रानभाज्यांच्या लागवडीसाठी पुढाकार घेऊन मार्गदर्शन पुरवलं गेलं. मधमाश्या आणि मधाच्या पोळ्यांचं संरक्षण व संवर्धनाचं कौशल्य स्थानिक आदिवासी समूहाला शिकवलं गेलं आणि शाश्वत मध काढणीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्यही केलं गेलं.*

सर्वसामान्य आदिवासी व्यक्तींनी, समूहांनी त्यांच्या हक्काबद्दल बोलणं, हक्काच्या जोडीने येणाऱ्या जबाबदाऱ्या निभावणं आणि त्यासाठी स्थानिक पातळीवर कार्यरत होणं हे वाटतं तितकं सोपं नसतं. तरी इकोनेटचं पाठबळ घेऊन वन हक्क कायद्याच्या अमलबजावणीसाठी कृतिशील झालेल्या स्थानिक संस्था व कार्यकर्त्यांची पावलं ना थकली आहेत ना थांबली आहेत. 'हे असं कसं घडतं?', 'यांना संघर्ष करून थकायला होत नाही का?' 'अडचणी आल्या

तर हताश व्हायला होत नाही का?' या अशा सगळ्या प्रश्नांवर साधं सरळ उत्तर येतं – ''हताश का म्हणून व्हायचं? आमच्याकडच्या गावात दारूबंदी घडवून आणणाऱ्या बायका बघा. इतक्या हिमतीच्या आहेत त्या; की त्यांच्याकडे बघून सगळी हताशा जाते. 'दारूबंदी का केलीस?' म्हणून त्या घरी मार खातात त्यांच्या नवऱ्याच्या हातचा. तरीसुद्धा बिचकत नाहीत. 'दारू नको!' या आग्रहासाठी जे सोसावं लागेल ते निमूट सोसतात; पण मागं हटत नाहीत. दारूबंदी हिताची आहे यावरचा त्यांचा विश्वास ढळत नाही. आपण केलंय ते बरोबरच आहे, यावर त्या ठाम राहतात. मग वन हक्क मिळवायला जरा सोसावं लागलं, त्रास काढायला लागला, वेळ लागला तर हताश कशाला व्हायचं?''

ही अशी निर्धाराची पक्की गाठ मनाशी बांधलेली असल्यामुळे वन हक्काची लढाई चालू राहिली आहे. हताश न होता गावोगावी हिमतीने बदलासाठी पावलं पडत राहिली आहेत. त्यामुळेच एव्हाना इकोनेटच्या प्रकल्पक्षेत्रात एकंदर ५८६ वैयक्तिक आणि २३ सामूहिक दावे मंजूर झाले आहेत. आतापर्यंत २९ गावं, ४ कार्यकर्ते आणि एक संस्था एकमेकांच्या साथी सोबतीने आपल्या हक्कांसाठी कार्यरत झाली आहेत. या प्रयत्नांमधून ५,१०५ हेक्टर वनजमीन सर्वसामान्य आदिवासी लोकांच्या अधिकारात आली आहे आणि बदलासाठी पडलेल्या या पावलांचा २७,१५९ इतक्या आदिवासींना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष लाभ झाला आहे. याव्यतिरिक्त सद्यस्थितीत वरील २९ गावांप्रमाणे नवीन ६८ गावांमध्ये २० कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन संस्था हे काम पुढे घेऊन जात आहे. आणि अशा तऱ्हेने ही पावलं यापुढेही पडत राहणार आहेत, बदल घडवत राहणार आहेत.

* * *




REDMI NOTE 7S
AI DUAL CAMERA


Shot on vivo Z1Pro
Vivo AI camera
2024.02.29 11:02


REDMI NOTE 7S
AI DUAL CAMERA


REDMI NOTE 7S
AI DUAL CAMERA



''इकोनेट, पुणे ही संस्था १९९३ पासून महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धन संरक्षण, समुदाय विकास, मनुष्य व संस्था नेतृत्व बांधणी या विषयावर महाराष्ट्रासह देशातील अन्य भागात सामाजिक कार्य करीत आहे विशेषत: आदिवासी व भटका विमुक्त सुमदाय हे संस्थेच्या कामाचे मुख्य बिंदू आहेत. ऐतिहासिक नालबंदीच्या जोरवडातून महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त समुदायाला बाहेर काढतांना नागरिकत्वाचे दाखले, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजिविका, युवा नेतृत्व बांधणी, महिला नेतृत्व बांधणी, संस्था विकास, अशा अनेक विषयांवर संस्था कार्यरत आहे. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची क्रमांक ५ मध्ये येणाऱ्या महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रात वन हक्क व पेसा या दोन महत्त्वाच्या कायद्यांची समज, माहिती व अमंलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी इकोनेट गेली २० वर्षे काम करित आहे. हे काम करतांना स्थानिक संस्था, ग्राम सभा व आदिवासी व्यक्ती यांच्या सोबत एका शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्थानिक आदिवासी समुदायातील कार्यकर्ते तयार करून, एकंदर आदिवासी स्व:शासन संकल्पनेला इकोनेट प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करीत आहे. इकोनेट ही संस्था आज महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यात जवळपास ४२ भटक्या विमुक्त व ९ आदिवासी समुदायांच्या सोबत कार्यरत आहे. इकोनेटचे ध्येय आदिवासी व भटक्या विमुक्त समुदायांना त्यांचे संविधानिक व कायदेशीर अधिकार प्राप्त करून त्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या सक्षम करणे व त्यांच्या सहभागातून भटक्या विमुक्त व आदिवासी समुदायांचा शाश्वत विकास करणे हे आहे.

समुदायातील लोकांना वनहक्क कायदा आणि त्यातील तरतुदी सोप्या आणि सहज समजून त्याचा त्यांना लाभ घेता यावा या उद्देशाने या माहिती पुस्तिकेचे निर्माण करण्यात आलेले आहे.

ECONET

## इकोनेट

फ्लॅट नं. २, गुलमोहर ओरीयन, एस.आर.पी.एफ. गेट नं १ जवळ,
सर्व्हे नं. ११०/अ/९, रामटेकडी रोड, हडपसर,
पुणे : ४११ ०१३, महाराष्ट्र.
फोन : (+९१) ७४२००२७७५५
ईमेल : econet.pune@gmail.com वेबसाईट : www.econetindia.org